# पावसाळ्यामध्ये शेळ्यांची घ्यावयाची काळजी

प्रा. के. एल. जगताप
विषय विशेषज्ञ (पशू संवर्धन व दुग्धशास्त्र)

डॉ. तुकेश सुरपाम
विषय विशेषज्ञ

प्रा. दिप्ती पाटगावकर
कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव

पावसाच्या वातावरणामध्ये जिकडे पहावे तिकडे दमटपणा, ओलसरपणा हा असतोच किंबहुना थंडीलादेखील सुरुवात झालेली असते त्यामुळे रोगांचा, जंतूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत असतो अशा या वातावरणामध्ये शेळ्यांना विविध प्रकारचे आजार होऊ शकतात त्यामुळेच या दिवसात म्हणजेच पावसाळ्यामध्ये शेळ्यांची विशेष काळजी घेणे गरजेचे असते म्हणूनच आज आपण या लेखांमध्ये शेळ्यांची पावसाळ्यात घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तरपणे चर्चा करणार आहोत.

शेळीपालन हा व्यवसाय मुख्यत्वेकरून हिवाळी हंगामात सुरु करावा त्याचं कारण म्हणजे हिवाळा आरोग्यासाठी अतिशय पोषक असा मानला जातो जर पावसाळ्यात चारा लागवड करून ठेवली व चारा खाणे योग्य झाला की हिवाळ्यात शेळ्यांची खरेदी करावी. शक्यतो पावसाळ्यामध्ये शेळ्यांना जास्तीत जास्त रोगाची लागत असते त्यामुळेच पावसाळ्यात शक्यतो शेळीपालनाची सुरुवात टाळावी.

## शेळ्यांचा गोठा:

पावसाळ्यात शेळ्यांच्या गोठ्यामध्ये पावसाचे पाणी येऊ नये म्हणून उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत नसता गोठ्यामध्ये ओलसरपना जाणवेल व शेळ्यामध्ये सर्दीचा प्रादुभाव होईल म्हणूनच गोठ्याच्या खिडक्यांना ताडपत्री असेल किंवा प्लाष्टीक पेपर असेल त्याने पावसापासून शेळ्यांचे कशाप्रकारे संरक्षण होईल याचा विचार झाला पाहिजे. गोठा हा पावसाळ्यामध्ये साधारणतः पश्चिमेकडून पाऊस वाहतो येतो त्यामुळे शेळ्यांचे येणाऱ्या पावसापासून संरक्षण होण्यासाठी गोठ्यामध्ये आवश्यक ती उपाययोजना करणं अत्यंत गरजेचं काम आहे ज्यात शेळ्यांना ठेवण्यासाठी वेगवेगळे स्वतंत्र दालने असावीत यामुळे आजारी शेळ्या, पिल्ले, गाभण शेळ्या व बोकड वेग-वेगळी ठेवता येतील व शेळ्यांना आवश्यक तेवढीच जागा द्यावी जेणेकरून गर्दी होणार नाही.

## शेळ्यांचे आरोग्य:

पावसाळ्याच्या सुरुवातीला शेळ्यांना पशुवैद्यकांच्या मदतीने लाल्या खुरकूत, घटसर्प तसेच पीपीआर या रोगांच्या लसी वेळेवर देणे गरजेचे आहे. सगळ्यांना कोणत्याही प्रकारे लस ही रोग आल्यानंतर देऊ नये कारण विशिष्ट रोगाच्या साथीमध्ये रोग झालेल्या शेळीला जर आपण लस दिली तर तो रोग बरा न होता बळावतो. सप्टेंबर महिन्यात शेळ्यांना त्यांच्या वजनानुसारच योग्य जंतनाशकाची मात्रा देऊन जंत निर्मूलन करावे कारण ढगाळ व दमट वातावरण जंताच्या वाढीच्यासाठी पोषक असते. शेळ्यांना झालेल्या जखमावर माशा बसू नयेत तसेच त्या जखमा चिघळणार नाही याची दक्षता तसेच यासाठी बंदोबस्त करावा यासाठी कडुलिंब, निरगुडी किंवा करंजपाला याचा वापर करून शेडचे निर्जंतुक करून घेणे गरजेचे आहे. शेळ्यांच्या खुरामध्ये जखमा होऊन चिघळू शकतात यासाठी अशा शेळांना वाढलेल्या जागेत ठेवून त्या जखमा झालेल्या भागाला पोटॅशियम परमॅग्नेटने धुवून त्यावर मलापट्टी करावी शेडच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकणं गरजेचं आहे तसेच शेडमध्ये जमिनीवर हा चुनादेखील टाकावा शेळ्यांना बाहेरून येणारा रोगाचा कमीत कमी प्रादुर्भाव होईल.

## शेळ्यांचा आहार:

चाऱ्यांची कापणी केल्यावर तो चारा तसाच शेतामध्ये पाच तासापर्यंत ठेवावा त्यानंतरच तो चारा जनावरांना देणे महत्त्वाचे ठरेल कारण चाऱ्यामध्ये जर पाण्याचे प्रमाण जास्त असेल म्हणूनच ओला चारा थोडा वाळूवून घेण्याची आवश्यकता आहे जेणेकरून पचनास त्रास होणार नाही. दुसरी गोष्ट सांगायची म्हणजे गवतावर सकाळच्या वेळेस दव असते त्यामुळे शेळ्यांना आजूबाजूच्या परिसरामध्ये चरण्यासाठी सोडू नये. पशुखाद्य किंवा ओला चारा यांची साठवून करताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे कारण पावसाळ्यामध्ये अशा खाद्यास किंवा चा-यास बुरशी लागण्याची दाट शक्यता असते.

शेळ्यांना व पिल्लांना खनिज मिश्रण किंवा चाटण विटा या गोठ्यामध्ये लटकावून ठेवणे गरजेचे असते. पावसाळ्यामध्ये चालू ठेवावे कारण शेळ्या तसेच पिल्ले खनिजांच्या अभावामुळे माती खातात त्यामुळे त्यांना हगवण आजार होत असतो. पावसाळ्याच्या अगोदर पंधरा दिवस पैदाशी बोकडाला तीनशे ते साडेतीनशे ग्राम प्रतिदिन खुराक दिल्यास किंवा भरडा दिल्यास विर्याची मात्रा, विर्याची प्रतही सुधारते. चारा कडबा कुट्टिच्या साह्याने कुट्टी करून देणे गरजेचे आहे जेणेकरून जमिनीवर चारा पडून तो खराब होणार नाही शेळ्यांना पावसाळ्यामध्ये दिले जाणारे पाणी स्वच्छ व पिण्यायोग्य आहे याची खात्री करावी शारीरिक स्थितीनुसार गरजेएवढा चारा व खडक दिल्यास शेळ्यांचे आरोग्य हे उत्तम राहते.

वरील लेख आपण जर सविस्तरपणे अभ्यासला तर किंवा वाचन केल्यास पावसाळ्यामध्ये शेळ्यांची घ्यावयाची काळजी याविषयी माहिती मिळण्यास मदत होईल.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★